

**सौंदलगा :** सायबर सुरक्षितता जागृती अभियानाविषयी माहिती देताना क्विक हिल फाउंडेशनचे सदस्य व शिक्षक.

# सौंदलगा मुलींच्या शाळेत सायबर सुरक्षा जनजागृती

सौंदलगा, ता. ११ : येथील सरकारी उच्च प्राथमिक मराठी मुलींच्या शाळेत क्विक हिल फाउंडेशनने सायबर सुरक्षितता जागृती अभियान राबविले.

सायबर क्राईम आणि डिजिटल अरेस्टच्या नावाखाली ऑनलाईन फसवणूक, लिंक पाठवून होणारी फसवणूक याविषयी योगिता निकाडे, प्रनोती सुतार यांनी माहिती दिली. लघुनाट्य सादर करून त्याद्वारे आपली फसवणूक कशी केली जाते, याविषयी अनुभव सांगितला. मुख्याध्यापिका जी. के. जोगे, शारदा वडगावे, संगीता परीट, संगीता डावरे, सुरेखा मगदूम, वैशाली कांबळे, अश्विनी मेस्त्री व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.